NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.

NAV-BHARAT, Mumbai, 4.5.2024
Page No. 12, Size:(10.28)cms X (6.43)cms.

# युवाओं को सशक्त बनाने बुलेट ट्रेन प्रोजेक्ट

## जिले के लगभग 19 युवा लाभान्वित होंगे, प्रशिक्षण एनएसडीसी से जुड़ा




■ मुंबई, नवभारत न्यूज नेटवर्क. इनकम रिस्टोरेशन प्रोग्राम के तहत नेशनल हाई स्पीड रेल कारपोरेशन लिमिटेड (एनएचएसआरसीएल) रुस्तमजी अकादमी फॉर ग्लोबल करियर प्राइवेट लिमिटेड के सहयोग से पालघर जिले के परियोजना प्रभावित गांवों के युवाओं को तीन महीने का सहायक इलेक्ट्रीशियन प्रशिक्षण प्रदान कर रहा है. 4 अप्रैल से शुरू हुए प्रशिक्षण से जिले के लगभग 19 युवा लाभान्वित होंगे. प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय कौशल विकास निगम (एनएसडीसी) के साथ भी जुड़ा हुआ है. प्रशिक्षण का उद्देश्य युवा व्यक्तियों को मूल्यवान कौशल और करियर की संभावनाएं प्रदान करके उनकी मदद करना है, साथ ही उद्यमशीलता का पता लगाने के लिए प्रेरित करना है. कार्यक्रम के कारण युवा काफी कुछ सीख रहे है, जैसे की इंस्टॉलेशन, मरम्मत, रखरखाव सहित विभिन्न विद्युत कार्यों में इलेक्ट्रीशियन की सहायता करना, निर्माण स्थलों पर अस्थायी लो-वोल्टेज विद्युत कनेक्शन ठीक करना, निर्माण विद्युत परियोजनाओं से संबंधित हाथ के उपकरण, विद्युत उपकरणों का कुशलतापूर्वक उपयोग करना, निर्माण स्थलों पर अस्थायी लो-वोल्टेज विद्युत पैनल को एसेम्बल और प्रबंधित करना और सुरक्षा और अनुपालन सुनिश्चित करें.

LOKSATTA, Mumbai, 2.5.2024
Page No. 4, Size:(9.45)cms X (12.74)cms.

**Three months Assistant Electrician Training to the youths of the project affected villages of Palghar district**

## 'बुलेट ट्रेन'तर्फे युवकांना प्रशिक्षण

**मुंबई :** नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एएचएसआरसीएल) देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम हाती घेतले असून, अनेक पायाभूत कामे पूर्णत्वास येत आहेत. तर दुसरीकडे इन्कम रेस्टोरेशन प्रोग्रॅम एएचएसआरसीएल रुस्तमजी ॲकॅडमी फॉर ग्लोबल करिअर्स प्रायव्हेट लिमिटेड विरार / वसई - पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने पालघरमधील प्रकल्पग्रस्त गावांतील तरुणांना तीन महिन्यांचे साहाय्यक इलेक्ट्रिशियन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

वृत्त...४



# 'बुलेट ट्रेन'तर्फे पालघरच्या युवकांना प्रशिक्षण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एएचएसआरसीएल) देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम हाती घेतले असून, अनेक पायाभूत कामे पूर्णत्वास येत आहेत. तर दुसरीकडे इन्कम रेस्टोरेशन प्रोग्रॅम एएचएसआरसीएल रुस्तमजी ॲकॅडमी फॉर ग्लोबल करिअर्स प्रायव्हेट लिमिटेड विरार / वसई - पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने पालघरमधील प्रकल्पग्रस्त गावांतील तरुणांना तीन महिन्यांचे साहाय्यक इलेक्ट्रिशियन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या कंपनीने देशातील पहिली मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम हाती घेतले आहे. तसेच सामाजिक दायित्व म्हणून अनेक समाजोपयोगी कामे एनएचएसआरसीएलतर्फे केली जात आहे. नेत्र तपासणी, मोतीबिंदूवर उपचार केला जात आहे. तर पालघरमधील तरुणांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाशी (एनएसडीसी) हा प्रशिक्षण कार्यक्रम संलग्न आहे. या प्रशिक्षणाचा उद्देश तरुणांना मौल्यवान कौशल्ये आणि करिअरच्या संधी देऊन त्यांना मदत करणे आणि त्यांना उद्योजकतेच्या संधी शोधण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. ४ एप्रिल २०२४ पासून सुरू झालेल्या या प्रशिक्षणाचा लाभ पालघरमधील सुमारे १९ तरुणांना होणार आहे, असे एनएचएसआरसीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

तीन महिन्यांचे तरुणांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर इन्स्टॉलेशन, दुरुस्ती आणि मेंटेनन्ससह विविध कामे करण्यास सक्षम असतील, असे एनएचएसआरसीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.

TARUN BHARAT, Mumbai, 1.5.2024
Page No. 1, Size:(8.84)cms X (21.07)cms.

**Three months Assistant Electrician Training to the youths of the project affected villages of Palghar district**

प्रशिक्षणाअंती शेकडो प्रकल्पबाधित तरुण प्रकल्प स्थळांवर रुजू

# बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील शेकडो तरुणांच्या हाताला काम

**गायत्री श्रीगोंदेकर** **मुंबई, दि. ३० :** भारतातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही राज्यांतील शेकडो तरुण तांत्रिक प्रशिक्षण घेऊन रोजगारक्षम झाले आहेत. महाराष्ट्रातील १३२ प्रकल्पबाधित तरुणांना प्रशिक्षित करण्यात आले असून हे तरुण आज प्रकल्प स्थळांवर कार्यरत आहेत, अशी माहिती **(पान ६ वर)**



## बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील शेकडो तरुणांच्या हाताला काम

**(पान ३ वरुन)** नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने दिली आहे. एनएचएसआरसीएलने दिलेल्या आकडेवारीनुसार, दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत ५०६ प्रकल्पबाधित तरुणांनी विविध तांत्रिक कौशल्य प्रशिक्षण घेतले. त्यापैकी ३७४ तरुण हे गुजरातमध्ये, तर महाराष्ट्रातील १३२ तरुणांनी सहभाग नोंदविला आहे. सद्यःस्थितीत पालघर जिल्ह्यातील १९ तरुणांना सहायक इलेक्ट्रिशियनचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. एनएचएसआरसीएल आणि रुस्तमजी अकॅडमी फॉर ग्लोबल करिअर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या सहकार्याने पालघरमधील प्रकल्पग्रस्त गावांतील तरुणांना हे तीन महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. ४ एप्रिलपासून सुरू झालेल्या या प्रशिक्षणाचा जिल्ह्यातील १९ युवकांना लाभ होणार आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एनएसडीसी) शीदेखील संलग्न आहे.

नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माध्यमातून भारतात पहिला बुलेट ट्रेन प्रकल्प साकारण्यात येत आहे. महाराष्ट्रातील पालघर, वसई-विरार, ठाणे, बोईसर याठिकाणी प्रकल्पांच्या कामांना वेग आहे. तत्पूर्वी, या प्रकल्पासाठी दोन्ही राज्यातील जमिनीचे अधिग्रहण करण्यात आले. या प्रकल्पासाठी १०० टक्के भूमी अधिग्रहण पूर्ण झाले आहे. इतकेच नाहीतर प्रकल्पबाधित तरुणांनाही रोजगार देण्याचे काम या प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यात आले. बांधकामाच्या टप्प्यातच या प्रकल्पातून सुमारे ८०,००० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**प्रशिक्षित तरुण करणार ही कामे**

- इन्स्टॉलेशन, दुरुस्ती आणि देखभाल
- विविध इलेक्ट्रिकल कामांमध्ये इलेक्ट्रिशियन्सना मदत
- बांधकाम साइट्सवर तात्पुरते कमी-व्होल्टेज विद्युत कनेक्शन उभारणे
- बांधकाम प्रकल्पांशी संबंधित हँड टूल्स, पॉवर टूल्स आणि इलेक्ट्रिकल उपकरणांचा कौशल्यपूर्ण वापर
- बांधकामाच्या ठिकाणी तात्पुरते लो-व्होल्टेज इलेक्ट्रिकल पॅनल (वितरण बोर्ड) लावणे आणि संचलन
- निवासी आणि व्यावसायिक इमारतींमध्ये कायमस्वरूपी विद्युत कनेक्शन स्थापित करणे

**प्रशिक्षण कार्यक्रम**

- महिलांसाठी शिलाई आणि टेलरिंग प्रशिक्षण
- टू व्हीलर मेकॅनिक प्रशिक्षण
- संगणक हार्डवेअर आणि नेटवर्किंग प्रोग्रॅम
- डिजिटल मार्केटिंग
- महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण
- प्रकल्पस्थळांवर आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण